# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**महाविद्यालयीन शाखा**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१दुरध्वनि क्रमांक ०७१२–२५२९९३२

फॅक्स नं. ०७१२५५५७०१Email ID : ar-cs@nagpuruniversity.org


क्र.म.वि. 5557.A                                                    दिनांकः– 02/3/ २०१७.

C/1588

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
संस्थेंतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ,नागपूर.

**विषयः–अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत नियम व नियमन २०११ आपल्या विश्वविद्यालयातील तसेच आपल्या विश्वविद्यालयातील संलग्न महाविद्यालयातील कॅन्टीन/मेस साठी परवाने घेण्यास बाध्य करणेबाबत.**

**संदर्भः–सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,नागपूर यांचे पत्र क्र.सुमाका/कॅन्टीनपरवाना/१५१५/२०१७/३, दि. ३०–०१–२०१७.**

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेअंतर्गत असलेल्या महाविद्यालयातील कॅन्टीन/मेस धारकांनी हा व्यवसाय सुरु करण्या आधी परवाना घेणे बंधनकारक असून विना परवाना व्यवसाय करणे हा गुन्हा आहे. त्यामुळे हया व्यवसायाकरिता विषयांकित अधिनियमांतर्गत परवाना घेण्यात आला आहे किंवा नाही याबाबत आपण खातरजमा करुन परवाना घेतला नसल्यास अशा कॅन्टीन/मेस धारकांना परवाना घेण्यास बांध्य करावे असे अन्न व औषध प्रशासन विभागाने कळविले आहे. तसेच या व्यवसायधारकांनी ऑनलाईन अर्ज कसा करावा याबाबत सोबत दर्शविलेल्या संकेत स्थळावर मार्गदर्शनपर माहिती देण्यात आली असून आपल्या सुलभ संदर्भाकरिता उपरोक्त पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

तरी या संदर्भात त्वरित आवश्यक ती कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तसेच विद्यापीठास पाठवावा.

कळावे.

आपला,

(डॉ डी.के. अग्रवाल)
संचालक (म.वि.वि.मं.)

सहपत्रे :वरिलप्रमाणे